जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)
दुरध्वनी क्र.०२०-२६१२३३७१
E-Mail- homebranchpune@gmail.com

क्र.जि.आ.व्य/कावि/ २९७/२०२०
पुणे, दिनांक :-२७/०३/२०२०

वाचले :-

१) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
२) आपत्ती व्ययस्थापन अधिनियम २००५
३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्रमांक कोरोना/२०२०/प्रक्रं.५८/आरोग्य -५ दि.१३.०३.२०२०, दि.१४.०३.२०२० तसेच दि.१५.०३.२०२० रोजीची अधिसुचना
४) इकडील जा.क्रं.नैआ/करोना विषाणु/१५४/२०२० दि.२२.०३.२०२० रोजीचा आदेश
५) फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४(१)(३) आदेश क्रं.नैआ/कोरोना विषाणु/१५१/२०२० दि.२२.०३.२०२०
६) इकडील जा.क्रं.जि.आ.व्य/करोना विषाणु/१५६/२०२० दि.२२.०३.२०२० रोजीचा आदेश
७) महाराष्ट्र शासन यांचेकडील नं.DMU/२०२०/CR.९२/DISM-१ दि.२३.०३.२०२०

---

## आदेश

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणुचा (कोव्हीड- १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ च्या खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दि.१४ मार्च २०२० रोजी अधिसुचना निर्गमित केलेली आहे. तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे, व त्यातील पोटकलम २(अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. तसेच दि.१४ मार्च २०२० च्या अधिसुचनेमध्ये नमुद नियम १० नुसार सदर नियमांची अंमलबजावणी करणेकामी जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषित केलेले आहे.

त्याअर्थी कोरोना या विषाणूचा संसर्ग व प्रादूर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सद्यस्थितीत कोरोना साथ व इतर उपचारांसाठी जिल्ह्यातील काही खाजगी रूग्णालय बंद ठेवले जात असलेचे माझ्या निदर्शनास अले आहे व त्यामुळे नागरीकांची गैरसोय होत आहे. तरी सर्व प्रकारच्या नोंदणीकृत डॉक्टर्स/वैद्यकीय व्यवसायीक यांनी सर्व खाजगी दवाखाने, सर्व रूग्णालये व सर्व मेडीकल दुकाने सुरू ठेवणे आवश्यक आहे. आजारी नागरीकांची गैरसोय टाळणेसाठी पुणे जिल्ह्यातील डॉक्टर्स/वैद्यकीय व्यवसायीकांना सर्व खाजगी दवाखाने, सर्व रूग्णालये तसेच सर्व मेडीकल दुकाने त्यांचे दैनंदिन वेळेनुसार सुरळीतपणे सुरू ठेवणेबाबत जाहिर आवाहन करणेत येत आहे.

तरी कोणत्याही डॉक्टर्स/वैद्यकीय व्यवसायीक यांनी अशा अपात्कालीन परिस्थितीत जर खाजगी व्यवसायीक डॉक्टर/वैद्यकीय व्यवसायीक कोरोना व्हायरस (कोव्हीड १९) च्या संसर्गाच्या भितीने वैद्यकीय सेवा देत नसलेचे, तसेच ओपीडी व रूग्णसेवा बंद ठेवणेत आले असलेचे निदर्शनास आलेस संबंधीत डॉक्टर/वैद्यकीय व्यवसायीक यांच्यावर आपत्ती अधिनियम २००५ व महाराष्ट्र कोव्हीड उपाययोजना नियम २०२० व साथ रोगअधिनियम १८९७ अन्वये कार्यवाही करणेत येऊन त्यांची नोंदणी रद्द करणेकरीता इंडियन मेडिकल कॉन्सिल तसेच आवश्यक त्या सक्षम प्राधिकाऱ्यास कळविणेत येईल. सर्व डॉक्टर्स/सर्व वैद्यकीय व्यवसायीकांनी खाजगी वैद्यकीय सेवा, ओपीडी व रूग्णालय सुरळीत सुरू राहतील याची दक्षता घ्यावी.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेश निर्गमित झालेपासुन तात्काळ करणेत यावी.

जिल्हाधिकारी
पुणे

( नवल किशोर राम)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे**



Scanned with CamScanner